# पुणे छावणी परिषद, पुणे
## गोळीबार मैदान, पुणे - ४११ ००१
## Notice for Expression of Interest
## ( स्वारस्याची अभिव्यक्ती सूचना )

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुणे छावणी परिषदेव्दारा संचलित शाळांमध्ये तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार पुणे छावणी परिषद हे बचत गट / स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्थांकडून स्वारस्याची अभिव्यक्तीसाठी ( Expression Of Interest) अर्ज मागवीत आहेत.

| | |
|---|---|
| १) कामाचे स्वरुप | केंद्र पुरस्कृत शालेय पोषणआहार योजनेंतर्गत पुणे छावणी परिषदेव्दारा संचालित शाळांमधील इ.१ली ते ८वी च्या विद्यार्थ्यांना तयार आहाराचा पुरवठा करणे. |
| २)अर्ज विक्री कालावधी | कार्यालयीन कामाच्या दिवशी दिनांक ०३/०५/२०१९ ते २२/०५/२०१९ सकाळी ११ ते सायंकाळी ५,०० वाजेपर्यंत |
| ३) अर्ज विक्री व स्विकारण्याचे ठिकाण | कार्यालय अधिक्षक, पहिला मजला, पुणे छावणी परिषद, गोळीबार मैदान, पुणे ०१ |
| ४)अर्ज स्विकृती | कार्यालयीन कामाच्या दिवशी दिनांक ०३/०५/२०१९ ते २२/०५/२०१९ सकाळी ११ ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ५) अर्जाची किंमत | पुणे छावणी परिषद क्षेत्रासाठी रु.३,०००/- (रुपये तीन हजार मात्र) (विनापरतावा) कार्यालयीन कामाच्या दिवशी सकाळी 10.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत |
| ६) कामाचा कालावधी | पुरवठा आदेश मिळाल्यापासून समाधानकारक काम असल्यास ३ वर्षे |

२) सविस्तर सूचना/ अटी व शर्ती ह्या कार्यालय अधिक्षक, पुणे छावणी परिषद, गोळीबार मैदान, पुणे ०१ यांच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

३) उपरोक्त स्वारस्याच्या अभिव्यक्तीसाठीचे अर्ज Chief Executive Officer, Pune Cantonment Board यांच्या नावाने काढलेला पुणे येथे देय असलेला धनादेश (डी.डी.) किंवा रोख स्वरुपात भरल्यानंतर मिळतील.

४) इच्छुक बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्थांनी आपले परिपुर्ण प्रस्ताव विहित मुदतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे छावणी परिषद, गोळीबार मैदान, पुणे ०१ या कार्यालयात सादर करावेत.

५) अर्ज सादर करावयाच्या लिफाफ्यावर पुणे छावणी परिषद स्तरावरील Expression of Interest प्रक्रियेसाठी अर्ज असे स्पष्टपणे नमूद करावे.

६) पुणे छावणी परिषद, पुणे यांजकडून अर्जाची छाननी होऊन पात्र बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्थेस पुरवठा आदेश देण्यात येईल.

७) कोणतेही कारण नमूद न करता अर्ज स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे छावणी परिषद यांचेकडे राखून ठेवला आहे.

सही /-

मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे छावणी परिषद

पुण छावनी परिषद
**PUNE CANTONMENT BOARD**
गोलीबार मैदान, पुणे – ४११ ००१, दूरभाष : 26452159
**Golibar Maidan, Pune – 411 001. Tel. : 26452159**
Email Id : ceopunecantt@gmail.com

## NOTICE FOR EXPRESSION OF INTEREST

**EXPRESSION OF INTEREST INVITED FOR SUPPLY OF COOKED FOOD FROM CENTRALISED KITCHENS TO PUNE CANTONMENT SCHOOLS UNDER MID DAY MEAL SCHEME.**

Expression of Interest are invited from eligible Self Help Groups, Non-Government Organisations and Societies for supply of cooked food from their Centralised Kitchen to the students of Pune Cantonment Board schools from Std. 1st to 8th under Mid day Meal Scheme of the Government .

The interested organizations / institutions have to submit their Expression of Interest in the prescribed form, which will be available in the Office of the Pune Cantonment Board, Golibar Maidan, Pune on payment of Rs. 3,000/- (Non-Refundable). The details are available on the website of the Board www.punecantonmentboard.org.

Expression of Interest proposal will be accepted in the office of Pune Cantonment Board, Golibar Maidan, Pune from 02.05.2019 at 11.00 am to 22.05.2019 upto 03.00 pm.

Place:- Pune
Date :- 02.05.2019

Sd/-
Chief Executive Officer
Pune Cantonment Board
(Dr. D N Yadav)

# पुण छावनी परिषद
**PUNE CANTONMENT BOARD**
**गोलीबार मैदान, पुणे – ४११ ००१, दूरभाष : 26452159**
**Golibar Maidan, Pune – 411 001. Tel. : 26452159**
Email Id : ceopunecantt@gmail.com


---

## स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) सूचना

### शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्रीय स्वयंपाक गृहामार्फत शाळांना शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करण्याकरिता पात्र संस्थांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression Of Interest) मागविण्याबाबत.

पुणे छावणी परिषदे व्दारा संचालित शाळेतील इ.१ली ते ८वीच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत महिला बचत गट / स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्थांच्या केंद्रीय स्वयंपाक गृहामार्फत शासनाने ठरविलेल्या दरात शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करण्यासाठी पात्र संस्थांकडून स्वारस्याची अभिव्यक्तीचे(Expression Of Interest) अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक संस्थांना स्वारस्याची अभिव्यक्तीचे (Expression Of Interest) अर्ज पुणे छावनी परिषदेच्या कार्यालयात रुपये 3,000 /- (विना परतावा) भरल्यानंतर देण्यात येतील. (EOI) बाबतची संपूर्ण माहिती www.punecantonmentboard.org या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

स्वारस्याच्या अभिव्यक्ती चे ( Expression Of Interest) प्रस्ताव दिनांक ०२/०५/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते दिनांक २२/०५/२०१९ रोजी दुपारी ३.०० पर्यंत पुणे छावनी परिषद, गोळीबार मैदान, पुणे – 1, या कार्यालयात जमा करता येतील.

ठिकाण :- पुणे सही /-
दिनांक :- ०२/०५/२०१९

मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे छावणी परिषद

## पुणे छावणी परिषद, पुणे

## शालेय पोषण आहार योजना

अर्जाचा क्रमांक.....................

**पुणे छावणी परिषद मध्यवर्ती स्वयंपाक गृह निवडी करता स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रियेसंदर्भात बचत गट / स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था यांनी भरावयाच्या अर्जाचा नमुना**

१.ज्या छावणी परिषदेसाठी अर्ज केला आहे त्या छावणी परिषदेचे नांव व संबंधित तालुका व जिल्ह्याचे नांव:-

______________________________________________

२.बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था नांव:- ______________________

______________________________________________

३. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था कार्यालयाचा पुर्ण पत्ता संपर्कासाठी प्रतिनिधीचे नांव व दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक ई-मेल आय डी:- ______________________

______________________________________________

______________________________________________

४. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था नोंदणी प्रकार (सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०/संस्था नियम अधिनियम १८६०/सहकारी संस्था अधिनियम १९६०/ कंपनी नोंदणी कायदा २०११) यांपैकी एक :- ______________________

______________________________________________

५. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था नोंदणी क्रमांक व दिनांक:- ______________

______________________________________________

६. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था स्वयंपाक गृहाचा संपुर्ण पत्ता:- ______________

______________________________________________

______________________________________________

७. स्वयंपाक गृहाची जागा मालकीची / भाड्याची आहे.जागेचा संपुर्ण पत्ता:- ______________

______________________________________________

८.स्वयंपाक गृहाचे क्षेत्रफळ (चौरस फुटामध्ये) :- ______________________

९.बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय  संस्था गोडाउनचे क्षेत्रफळ (चौरस फुटामध्ये):- ______________

______________________________________________________________________

१०. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय  संस्था असलेल्या कामाचा अनुभव:-____________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

| अ.क्र. | शासकीय/निमशासकीय संस्था/खाजगी (वस्तीगृहे,जिमखाना,खाजगी कार्यक्रम इ.) आस्थापनेचा प्रकार (*) | ज्या आस्थापनेकडे अन्न शिजवून दिले त्या आस्थापनेचे नांव व पत्ता | अन्न शिजवून देण्याचे काम केल्याचा कालावधी | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(* - अधिक  माहिती साठी या अर्जा सोबत वेगळी शीट लेटर हेड वर टाईप करुन जोडावी)

११.आर्थिक वर्ष सन २०१६-१७ व २०१७-१८ मधील संस्थेची सरासरी उलाढाल (लाखामध्ये):- _________

______________________________________________________________________

१२. अन्न सुरक्षा व मानके अधिनियम सन २०११नुसार अन्न शिजविण्याचा परवाना क्रमांक व दिनांक :- ____

______________________________________________________________________

१३. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय  संस्थेकडे अन्न शिजविण्यासाठी आरोग्य दृष्ट्या पात्र असलेला व संसर्ग जन्य रोगांपासून मुक्त असलेला कर्मचारी वर्ग संख्या:- ____________________________________

______________________________________________________________________

१४. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय  संस्थाकडे महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपरिषद/ कटक मंडळ यांचे आरोग्य अधिकारी/सक्षम अधिकारी यांचा स्वयंपाक गृहाचा ( Kitchen NOC) / अन्न शिजवून तयार करण्याचा परवाना (Cooking License) क्रमांक व दिनांक:- ____________________________

______________________________________________________________________

१५.स्वयंपाक गृहासाठी अग्निसुरक्षा प्रमाण पत्र क्रमांक व दिनांक:- ______________________________

______________________________________________________________________

१६.अन्न भेसळ अधिनियम अंतर्गत परवाना कमांक व दिनांक:- ________________________________

______________________________________________________________________

१७. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्थाकडे असलेली वाहने त्यांची संख्या व RC Book क्रमांक यांच्या प्रति ( अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २०११ अंतर्गत वाहतुकीच्या परवानासह):- ____________

________________________________________________________________________

१८. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था काळया यादीत आहे काय ? (होय/नाही) नसल्यास१००रुपयांच्या स्टँपपेपरवर नोटराईज प्रतिज्ञापत्र :-

__________________________________________

________________________________________________________________________

१९. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था/ पदाधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हा नोंद आहे काय?

________________________________________________________________________

________________________________________________________________________

२०. बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था / पदाधिकारी यांनी शासनाविरुद्द न्यायालयीन याचिका/ दावा दाखल केला/केली आहे काय? असल्यास तपशील द्यावा. ________________________________

________________________________________________________________________

________________________________________________________________________

मी / आम्ही अर्जातील सर्व नियम, अटी व शर्ती ह्या काळजीपुर्वक वाचल्या असून त्या आम्हाला मान्य आहेत. मी / आम्ही सर्व नियम, अटी व शर्तींची पुर्तता केलेली आहे. वर नमूद केलेली सर्व माहिती खरी व सत्य आहे. सदर माहिती चुकीची असल्याचे सिद्ध झाल्यास अर्जदार बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच संस्थेच्या प्रस्तावाचा विचार करण्यात येणार नाही. आम्हास काम मिळाल्यास ज्या शाळांचे आहार पुरविठ्याचे काम पुणे छावणी परिषद यांच्यामार्फत देण्यात येईल ते आम्हास विनातक्रार मान्य असेल याची संस्थेने नोंद घेतली आहे.

बचत गट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था अध्यक्ष /सचिव स्वाक्षरी

ठिकाण - पूर्ण नांव:- ______________________________

दिनांक- पदनाम:- ______________________________

शिक्का :-

**पुणे छावणी परिषद, पुणे**

**केंद्रिय स्वयंपाक गृह प्रणालीबाबत स्वारस्याची अभिव्यक्ती**

**(Expression of Interest)**

**योजनेची माहिती :-**

१. केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना राज्यामध्ये दिनांक २२नोव्हेंबर १९९५ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

२. केंद्र व राज्य शासनाच्या ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या , खाजगी संस्थांच्या अनुदानित व अंशत : अनुदानित शाळा, वस्ती शाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्र या ठिकाणी इ.१ली ते ८वी पर्यंतचे शिक्षण घेणारे विद्यार्थी शालेय पोषण आहार य़ोजनेचे लाभार्थी आहे.

३. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग , महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक १८ जुन २००९ च्या शासन निर्णयानुसार आणि शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून ( महाराष्ट्र शासन) दिनांक ०३ ऑगस्ट २०१८ रोजी उच्च स्तरीय समितीच्या निर्णयानुसार , राज्चातील महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद / कटक मंडळ क्षेत्रातील योजनेच्या पात्र शाळांमधील विद्यार्थ्यांना योजनेंतर्गत शिजवलेल्या गरम आहाराचा (Cooked Food) पुरवठा करण्यासाठी बचत गट / स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**४. कामाचे स्वरुपः-**

४.१ शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत इ .१ली ते ५वी या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त मध्यान्ह भोजन आणि इयत्ता ६ ते ८वी या उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनेयुक्त मध्यान्ह भोजन पुरविण्यात येते. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रति दिन १०० ग्रॅम तांदूळ आणि उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रति दिन १५० ग्रॅम तांदूळ मोफत देण्यात येतो . या तांदूळाशिवाय शासनाने विहीत केलेल्या प्रमाणानुसार संबंथित संस्थैने स्वखर्चाने खरेदी करुन अथवा पुरवठेदारामार्फत पुरविण्यात येणारा इतर आवश्यक धान्यादी माल , भाजीपाला इ. घटकांचा आहारात समावेश करुन विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न पुरवायचे आहे . शिजविलेल्या अन्नाचे सर्व साधारणपणे वजन प्रति विद्यार्थी प्राथमिक करीता ४०० ते ४५० ग्रॅम व उच्च प्राथमिक करीता ७०० ते ७५० ग्रॅम असणे आवश्यक आहे . संबंधित संस्थेस तांदुळाचा पुरवठा शासन स्तरावरुन करण्यात येईल.

४.२ नागरी भागाकरिता स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest)अर्ज प्रक्रियेतून पात्र ठरणाऱ्या व सर्वात जास्त गुण मिळालेल्या संस्थांना आहार वाटपाचे काम हे पारदर्शक पद्धतीने संस्थेच्या क्षमतेनुसार विभागून वाटप करण्यात येईल.

४.३ नागरी भागामध्ये तयार आहार पुरवठा करणाऱ्या संस्थैने स्वखर्चाने खाली नमूद अन्न शिजवण्याकरीता वापरावयाच्या धान्यादी वस्तू व त्याचे प्रति दिन प्रति विद्यार्थी प्रमाण या बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वस्तूचे नांव | प्राथमिक (ग्रॅममध्ये) | उच्च प्राथमिक (ग्रॅममध्ये) |
|---|---|---|---|
| १. | मूग डाळ | २०.०० | ३०.०० |
| २. | मसुर डाळ | २०.०० | ३०.०० |
| ३ | तूर डाळ | २०.०० | ३०.०० |
| ४. | हरभरा | २०.०० | ३०.०० |
| ५. | चवळी | २०.०० | ३०.०० |
| ६. | मटकी | २०.०० | ३०.०० |
| ७. | मूग | २०.०० | ३०.०० |
| ८. | वाटाणा | २०.०० | ३०.०० |
| ९. | फोर्टीफाईड ईडीबल सोयाबीन तेल (प्रति लीटर) | ५.०० | ७.५ |
| १०. | कांदा लसूण मसाला | ०.३० | ०.४५ |
| ११. | हळद पावडर (अँगमार्क) | ०.१५ | ०.२० |
| १२. | डबल फोर्टीफाईड मीठ(अँगमार्क) | २.०० | ३.०० |
| १३. | जिरे | ०.१० | ०.१५ |
| १४. | मोहरी | ०.१५ | ०.२० |
| १५. | मिरची पावडर (अँगमार्क) | ०.३० | ०.४५ |
| १६. | गरम मसाला (अँगमार्क) | ०.१० | ०.१० |
| १७. | भाजीपाला | ५० | ७५ |

४.४. महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक १८ जुन, २००९ व दिनांक २ फेब्रुवारी, २०११ मधील परिशिष्टात विहीत करण्यात आलेल्या पाककृतीप्रमाणे तसेच, खाली नमुद केलेल्या पाककृतीपैकी आठवड्यामध्ये विविध पाककृतींचा समावेश असलेला दररोज शिजवलेला ताजा व गरम आहाराचा पुरवठा संस्थेने संबंधित शाळांना करावयाचा आहे. या योजनेमध्ये लाभार्थ्यांना द्यावयाच्या पाककृती शासनामार्फत आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी विहीत करण्यात आलेल्या आहेत . सदर पाककृतीमधून दिवसनिहाय पाककृती निवड करण्याचे व त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना राहतील . सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | पाककृती |
|---|---|
| १. | डाळ तांदूळाची खिचडी (मूगडाळ) |
| २. | भात व कडधान्याची उसळ (मटकी) |
| ३. | भात व कडधान्याची उसळ (वाटाणा) |
| ४. | वरण भात (तूरडाळ) |
| ५. | भात व कडधान्याची उसळ (हरभरा) |
| ६. | भात व कडधान्याची उसळ (चवळी) |
| ७. | पुलाव भात |

तसेच, आठवड्यातून एकदा नियमित आहाराव्यतिरिक्त एक दिवस पुरक आहार दि . ०२ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या पदार्थापैकी (खजूर, चिक्की, राजगीरा लाडू, फळे इ.) स्वखर्चातून देणे अनिवार्य राहील.

प्रत्येक आठवड्याचा पुरक आहार प्रत्येक बुधवारी खालील नियोजनाप्रमाणे द्यावा –

१. महिन्याचा पहिला बुधवार – फळे स्थानिक उपलब्धतेनुसार
२. महिन्याचा दुसार बुधवार – शेंगदाणा लाडू/ चिक्की
३. महिन्याचा तिसरा बुधवार – राजगिरा / चुरमुरा लाडू
४. महिन्याचा चौथा बुधवार – खजुर / खारिक
५. महिन्याचा पाचवा बुधवार - फळे स्थानिक उपलब्धतेनुसार

जर बुधवारी शाळेला सुट्टी असेल तर लगतच्या शालेय दिवशी पुरक आहाराचे वाटप करण्यात यावे.

४.५ संबंधित संस्थेने आवश्यक असलेला भाजीपाला , कोथिंबीर, मिरची, टोमॅटो व इतर साहित्याचा स्वखर्चाने वापर करणे अनिवार्य राहील. अन्न शिजविण्याकरीता आवश्यक इंधन स्वखर्चाने वापरणे अनिवार्य राहील.

४.६ शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून मिळणारा तांदूळ हा अन्न शिजवून देणाऱ्या संस्थांना स्वतंत्र पुरवठेदारामार्फत उपलब्थ करुन देण्यात येईल . उपलब्ध करुन देण्यात आलेला तांदूळ सुस्थितीमध्ये ठेवण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

४.७ संस्थेने स्वत :च्या स्वयंपाकगृहामध्ये अन्न शिजवायचे आहे . शिजवलेले अन्न शाळास्तरापर्यंत वाहतूक करुन शाळेमध्ये विद्यार्थ्यांना रांगेमध्ये बसवून वाटप करावयाचे आहे . विद्यार्थ्यांनी आहार घेतल्यानंतर त्यांच्या जेवणाची ताटे व इतर भांडी स्वच्छ करणे व परिसर स्वच्छ करणे आदी कामे संबंधित संस्थेस करणे अनिवार्य राहील . तयार अन्नाचा पुरवठा शाळांपर्यंत करणे , विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप करणे , भांडी व परिसर स्वच्छ करणे ही सर्व जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. शाळा, शिक्षक व विद्यार्थी यांच्यावर या बाबतची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

४.८ शिजविलेले अन्न हवाबंद डब्यातून आणि अन्न व औषध प्रशासनाचा अन्न वाहतुकीचा परवाना असलेल्या वाहनातून अन्नाची वाहतूक शाळास्तरापर्यंत करणे अनिवार्य राहील.

४.९ संस्थेस आहार पुरवठ्याच्या कामाचे कंत्राट दिल्याच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षाच्या कालावधीत शालेय कामकाज सुरु असणाऱ्या प्रत्यैक शालेय दिवशी दैनंदिन तत्वावर संस्थेने शिजविलेल्या आहाराचा पुरवठा शाळेतील विद्यार्थ्यांना करावयाचा आहे.

४.१० शिजविलेल्या आहाराचा पुरवठा शाळेत पहिली ते आठवीच्या वर्गात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक / विभाग प्रमुख ठरवतील त्यावेळेत करावयाचा आहे . ज्या शाळेमध्ये दोन सत्रामध्ये वर्ग चालविले जात असतील अशा शाळेमध्ये पहिल्या व दुसऱ्या सत्रासाठी वेगवेगळ्या पाककृती देणे आवश्यक राहील. सकाळच्या सत्रासाठी सकाळी तयार केलेला

आहार आणि दुपारच्या सत्रासाठी दुपारी तयार केलेला आहार असणे आवश्यक आहे . शाळेचे मुख्याध्यापक / विभाग प्रमुख प्रत्येक महिन्याकरीता पटसंख्या व अपेक्षित सरासरी उपस्थिती निश्चित करुन ती माहीती संस्थेस लेखी देतील.

४.११ स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेव्दारे नियुक्त होणाऱ्या संस्थेने प्रति विद्यार्थी प्रति दिन प्राथमिकसाठी ४०० ते ४५० ग्रॅम वजनाचा व उच्च प्राथमिकसाठी ७०० ते ७५० ग्रॅम वजनाचा तयार आहार पुरवठा करणे बंधनकारक राहील . सदर आहास संबंधित संस्थेने MDM PORTAL वरील मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवरुन तयार करणे आवश्यक आहे . आहार तयार करण्यासाठी आवश्यक असणारा इतर धान्यादी माल खरेदीबाबत संबंथित संस्थांना खालीलप्रमाणे दोन पर्याय देण्यात येतील.

**पर्याय १ :-** ज्या संस्थांना स्वखर्चाने धान्यादी माल (उदा. कडधान्य, तेल, मसाला) खरेदी करुन शाळांना विद्यार्थीसंख्येनुसार शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करावयाचा आहे . अशा संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या आहाराचे नियमितपणे प्रतिदिन आहार पुरवठा करतेवेळी वजन केले जाईल आणि प्रत्यक्षात वजन (डब्याचे वजन वगळून ) त्याला ४०० ग्रॅम (प्राथमिकसाठी) / ७०० ग्रॅम (उच्च प्राथमिकसाठी) याच्याशी भागून प्रत्यक्षात किती विद्यार्थ्यांसाठी संस्थेकडून आहार आला आहे , याची परिगणना केली जाईल . अशी परिगणना करुन ज्या शाळेमध्ये फक्त प्राथमिक (इ.१ली ते ५वी) विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तेथे शिजविलेल्या आहारासाठी रुपये १०.९० प्रति किलो व ज्या शाळेमध्ये केवळ उच्च प्राथमिक (इ.६वी ते ८वी) शिक्षण घेत आहेत अशा शाळांसाठी रुपये ९ .३० प्रति किलो प्रमाणे रक्कम देय राहील . ज्या शाळांमध्ये प्राथमिक व उच्च प्राथमिक असे दोनही प्रकारचे वर्ग सुरु आहेत अशा शाळांसाठी शिजविलेल्या आहारासाठी रुपये १० .१० प्रति किलो याप्रमाणे देयके अदा केली जातील.

**पर्याय २:-** स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेव्दारे पात्र संस्थांना पुरवठेदाराकडून धान्यादी माल पुरविण्यात येईल. सदर धान्यादी मालाचा वापर करुन अन्न शिजवून देण्यास संस्था इच्छुक असल्यास अशा संस्थांना प्रस्तुत पुरवठेदारामार्फत धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येईल . सदर धान्यादी मालाचा वापर करुन संस्थांनी प्राथमिक वर्गासाठी ५० ग्रॅम प्रति विद्यार्थी व उच्च प्राथमिक वर्गासाठी ७५ ग्रॅम प्रति विद्यार्थी या प्रमाणात भाजीपाल्याचा वापर करुन अन्न शिजवून देणे आवश्यक राहील. यासाठी संबंधित संस्थेस इंधन व भाजीपाला खर्चापोटी प्राथमिक वर्गासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी रुपये १ .५७ व उच्च प्राथमिक वर्गासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी रुपये २.३५ याप्रमाणे देयकाची अदायगी करण्यात येईल.

४.१२ संस्थेची निवड झाल्यानंतर उपरोक्त दोन पर्यायांपैकी एक पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य संबंधित संस्थेस राहील. त्याप्रमाणे माहिती संबंधित शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना देणे आवश्यक राहील . स्विकृत केलेल्या पर्यायानुसार संबंधित संस्थेस देयकाची अदायगी करण्यात येईल. पुरवठा केलेल्या आहाराची रक्कम शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यावर करण्यात येईल . शाळा व्यवस्थापन समितीमार्फत संबंधित संस्थेस महिन्यातून किमान एक वेळा देयक अदा करण्यात येईल. शाळा व्यवस्थापन समितीने शासनाकडून देयकापोटी निधी प्राप्त झाल्यानंतर पुढील दहा दिवसात संबंधित संस्थेस देयकाची रक्कम अदा करणे बंधनकारक राहील . शालेय व्यवस्थापन समिती मार्फत अन्नाचा पुरवठा करणाऱ्या संस्थेला विहित कालावधीत देयके अदा होत नसतील तर संबंधित शालेय व्यवस्थापन समितीवर कारवाई करण्याचे व देयकांती अदायगी विहित

कालावधीत होण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे अधिकार संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांना राहतील.

**५ संस्थेच्या पात्रतेबाबत निकष :-**

५.१ ज्या स्वयंसेवी संस्थेमार्फत धर्म. जात आणि वंश या आधारे कोणताही भेदभाव करण्यात येत नाही किंवा कोणत्याही विशिष्ट धर्माचा प्रचार करण्यात येत नाही , अशी स्वयंसेवी / अशासकीय संस्था योजनेमध्ये भाग घेण्यास पात्र राहील.

५.२ सदरहू योजनेत भाग घेणारी संस्था ही सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६०, सहकारी संस्था अधिनियम १९६०, कंपनी नोंदणी कायदा अन्वये ना नफा ना तोटा या तत्वावर नोंदणी झालेली कंपनी अथवा आस्थापना किंवा बचतगट या संस्था कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणीकृत झालेल्या असावीत . सदर संस्थेची नोंदणी ही दिनांक १ एप्रिल २०१६ पूर्वी झालेली असणे आवश्यक आहे.

५.३ महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान १० ,००० विद्यार्थ्यांना आहार पुरविण्यासाठी एक युनिट व नगरपालिका / नगरपरिषद / कटक मंडळ यांना किमान ५००० विद्यार्थ्यांना आहार पुरविण्यासाठी एक युनिट याप्रमाणे अर्ज सादर करणे आवश्यक राहील . तथापि, **विद्यार्थी संख्येनुसार युनिट ठरविताना यामध्ये स्थानिक गरजा विचारात घेऊन बदल करण्याचे अधिकार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विभागप्रमुखास राहतील.**

५.४ आहार पुरविण्यासाठी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे . नगरपालिका / कटक मंडळ क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या एक युनिटसाठी अर्ज करणाऱ्या संस्थेचा आर्थिक उलाढाल सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये वार्षिक सरासरी रुपये 10 लक्ष एवढी असणे आवश्यक राहील . सदर आर्थिक उलाढाल ही आहार शिजवून त्याचे वाटप करण्यासंदर्भातील असणे आवश्यक आहे

५.५ संस्थेस शासकीय, निमशासकीय संस्थेस किंवा खाजगी उदा. वस्तीगृहे, जिमखाना, खाजगी कार्यक्रम इ. ठिकाणी अन्न शिजवून पुरवठा केल्याबाबत कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे

५.६ संस्थेकडे स्वयंपाकगृहासाठी तसेच गोडाऊनसाठी कटकमंडळ क्षेत्रानुसार खालीलप्रमाणे जागा असणे आवश्यक आहे. सदर जागा संस्थेच्या मालकीची किंवा रितसर नोंदणीकृत भाडेतत्वावर घेतलेली असणे आवश्यक आहे. भाडे करार स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज करण्यापूर्वीचा असावा.

| नागरी क्षेत्र प्रकार | स्वयंपाक गृहासाठी किमान जागा (Carpet area) चौरस फुट | गोडाऊनसाठी किमान जागा (Carpet area) चौरस फुट |
|---|---|---|
| नगरपालिका / नगरपरिषद / कटक मंडळे | ५०० | ५०० |

५.७ अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार संस्थेकडे अन्न शिजविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.

५.८ संस्थेकडे अन्न शिजवण्याच्या प्रक्रियेसाठी आरोग्यदृष्ट्या पात्र असलेला व कोणत्याही संसर्गजन्य रोगापासून मुक्त असलेला पुरेसा कर्मचारी वर्ग असणे बंधनकारक आहे . शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याकडून प्रत्येक कर्मचाऱ्याची आरोग्य तपासणी करुन घेणे आवश्यक आहे . सदर कार्यवाही संस्थेची निवड झाल्यानंतर १ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावी

५.९ शिजविलेल्या अन्नाची शाळास्तरापर्यंत वाहतूक करण्याकरिता स्वत :च्या मालकीची अथवा भाडेतत्वावरील प्रतियुनिट किमान ०१ वाहन असणे आवश्यक आहे. सदरील वाहनांना अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार वाहन परवाना असणे आवश्यक आहे . याबाबतचे स्वयंघोषणा पत्र व संबंधित वाहनांचे आर .सी .बुक आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत वाहतूकीचा परवाना कटक मंडळ , पुणे यांच्याकडे छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तयार आहाराचा पुरवठा अन्न तयार झाल्यापासून जास्तीत जास्त २ तासामध्ये शाळेपर्यंत पोहचणे आवश्यक राहील.

५.१० स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेसाठी नोंदणीकृत बचतगट अर्ज करण्यास पात्र राहतील

५.११ एक व्यक्ती अनेक संस्थांमध्ये पदाथिकारी असल्यास , अशा प्रकरणी कोणत्याही एकाच संस्थेने अर्ज सादर करणे अनिवार्य आहे . सदर अटीचे पालन न करणाऱ्या संस्था निवड करण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

५.१२ सदरील संस्थेच्याविरुद्ध किंवा संस्थेतील पदाथिकाऱ्याविरुद्ध कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा . तसेच, सदरील संस्थेचा काळ्या यादीत (Black Listed) समावेश झालेला नसावा.

**६. अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी :-**

६.१ संस्थेचे पदाधिकारी व संपर्क अधिकारी यांचे नाव , पदनाम, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, इ. बाबतचा तपशील.

६.२ संस्थेच्या उपविधीची प्रत / विधान पत्राची (Memorandum of Association) ची प्रत

६.३ संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

६.४ संस्थेच्या कार्याचा अहवाल

६.५ संस्थेस शासकीय / निमशासकीय कार्यालये, वस्तीगृहे किंवा अंगणवाड्या यांना आहार पुरवठा करण्यासंदर्भात अनुभव असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सदर प्रमाणपत्रामध्ये अन्न पुरविल्याच्या कालावधी व अन्न पुरवठ्याचा एकुण रकमेचा उल्लेख असावा

६.६ अग्नि सुरक्षितता प्रमाणपत्राची (Fire Safety Certificate) प्रत

६.७ अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार संस्थेचा अन्न शिजविण्याचा परवाना

६.८ शिजविलेल्या अन्नाची शाळास्तरापर्यंत वाहतुक करण्याकरिता स्वत :च्या मालकीची अथवा भाडेतत्वावरील प्रतियुनिट किमान ०१ वाहने असणे आवश्यक आहे. सदरील वाहनांना अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार वाहन परवाना असणे आवश्यक आहे . याबाबतचे स्वयंघोषणा पत्र व संबंधित वाहनांचे आर .सी. बुक व अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत वाहतुकीचा परवाना व भाडेकरार.

६.९ गुमास्ता अनुज्ञापत्राची प्रत (Shop Act License)

६.१० कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबतचे व काळ्या यादीत समावेश नसल्याबाबतचे (Black Listed) १०० रु. च्या स्टॅम्प पेपरवर अॅफिडेव्हिट

६.११ संस्थेचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले सन २०१६ -१७ व २०१७ -१८ या वर्षाचे आर्थिक ताळेबंद

६.१२ संस्थेकडे स्वयंपाकगृहासाठी तसेच गोडाऊनसाठी कटक मंडळ क्षेत्रानुसार आवश्यक असणाऱ्या जागेची कागदपत्रे (जागा स्वत :च्या मालकीची असल्यास ) किंवा नोंदणीकृत भाडेकरार (जागा भाड्याची असल्यास) या बाबतची कागदपत्रे

६.१३ उपरोक्त मुद्दा क्रमांक ५.६ नुसार आर्थिक उलाढालीबाबत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र.

**७. संस्थेची निवड करण्यची कार्यपध्दती :-**

७.१ मुद्दा क्र.५ मध्ये नमूद असलेल्या निकषानुसार पात्र असलेल्या संस्थांनी मुद्दा क्र .६ मध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची विहीत कालावधीत छाननी करण्यात येईल . तसेच त्यांचे गुणांकन करण्यात येईल.

७.२ पात्र झालेल्या संस्थांमधून कटक मंडळ कार्यक्षेत्रामधील केंद्रीय स्वयंपाकगृहाच्या निश्चित झालेल्या युनिट संख्ये इतक्या प्रमाणात सर्वाधिक गुणानुक्रमानुसार संस्थाची निवड करण्यात येईल . निवड झालेल्या संस्थांना आहार वाटपाचे काम विद्यार्थी / शाळा संख्येनुसार पारदर्शक पद्धतीने विभागून देण्यात येईल.

**८. सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

८.१ सदर संस्थेने शिजविलेल्या आहाराचा पुरवठा करण्यासंदर्भात द्यावयाची वार्षिक पुरवठ्याच्या ३ % म्हणजे ६०,०००/- रुपये याप्रमाणे राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँक यांचेकडून काढण्यात आलेल्या सुरक्षा अनामत रक्कम Chief Executive Officer, Pune Cantonment Board यांच्या नावे असलेल्या धनाकर्षाव्दारा (Demand Draft) या व्यतिरिक्त शासनाच्या तांदळासाठी स्वतंत्र सुरक्षा अनामत रक्कम सादर करणे आवश्यक आहे . कटक मंडळ क्षेत्रासाठी रु .५.०० लक्ष प्रति युनिट याप्रमाणे राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँक यांचेकडून काढण्यात आलेल्या सुरक्षा अनामत रक्कम RajyaSamanvayAdhikari, ShaleyPOshanAaharKaksh, Maharashtra Rajya, Pune) यांच्या नावे असलेल्या धनाकर्षाव्दारा (Demand Draft) भरण्यात यावी . सदर जमा सुरक्षा रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

८.२ शालेय पोषण आहार योजनेसाठी केंद्र शासनाकडून मिळणारा मोफत तांदूळ स्वतंत्रपणे नियुक्त केलेल्या कंत्राटदारामार्फत संस्थेस उपलब्ध करुन देण्यात येईल . सदर तांदळाची संस्थेने स्वत:च्या गोदामात आवश्यक सर्व उपाययोजना करुन सुस्थितीत साठवणूक करणे आवश्यक राहील

८.३ पुरवठादार संस्थेस तांदूळाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या वस्तू , भांडी किंवा पूरक पदार्थ शासनाकडून पुरविले जाणार नाही.

८.४ पुरवठादार संस्थेने आहाराची वाहतूक करणाऱ्या वाहनात प्रमाणित ईलेक्ट्रॉनिक वजन काटा ठेवला पाहिजे व प्रत्यक्ष आहार शाळेचे कर्मचारी वर्ग यांचेसमोर दररोज वजन करुन दिला पाहिजे

८.५ नियोजित पुरवठादार संस्थेस नेमून दिलेल्या शाळांमध्ये , आहार पुरवठ्याचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याकडे अधिकृत ओळखपत्र असणे आवश्यक आहे . सदर कर्मचाऱ्याची माहिती पुरवठादार संस्थेने कटक मंडळ, पुणे येथील शिक्षण विभागाचे अधिकारी यांचेकडे देणे बंधनकारक राहील

८.६ शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात केंद्र शासन व राज्य शासनाच्या आदेशांची / नियमांची अंमलबजावणी पुरवठादार संस्थेने करणे अनिवार्य राहील.

८,७ पुरवठादार संस्थेचे स्वयंपाकगृह , गोदाम, संस्थेतील सर्व लेखी नोंदवह्या तसेच अशा वाहनांची शासकीय अधिकारी तपासणी करतील , त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना संपुर्ण सहकार्य करण्याची संस्थेची जबाबदारी राहील.

८.८ शाळेमध्ये शिजविलेले अन्न पोहोच करणे तसेच सदर अन्नाचे विद्यार्थ्यांना वाटप करणे त्याप्रमाणे दि .०२/०२/२०११ च्या शासन निर्णयामध्ये स्वयंपाकी तथा मदतनीसाच्या कामासाठी विहित केलेल्या जबाबदाऱ्या संस्थेच्या राहतील.

८.९ अर्जदार संस्थेने सादर केलेल्या सर्व कागदपत्रातील प्रत्येक कागदपत्र नोटरी करुन सादर करणे अनिवार्य राहील.

८.१० शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार पुरवठा करण्यासाठी मागविण्यात आलेले अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे किंवा रद्द करणे याबाबत सर्व अधिकार पुणे छावणी परिषदेस राहतील.

८.११ शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शिजवलेला आहार पुरवठा करण्यासंदर्भात संस्थेबरोबर करावयाचा करारनामा / Memorandum Of Understanding हा ३ वर्षासाठी करण्यात येईल.

८.१२ संस्थेस नेमून देण्यात येणारी शाळा व विद्यार्थी संख्या यामध्ये बदल करण्याचा अधिकार पुणे छावणी परिषदेस राहील.

८.१३ किमान दोन महिन्यामध्ये एकदा कच्चा माल व तयार आहाराची तपासणी करण्यासाठी आहाराचे नमुने नियुक्त करण्यात येणाऱ्या संस्थेच्या खर्चाने शासकीय प्रयोगशाळेमध्ये अथवा शासनमान्य खाजगी प्रयोगशाळेमध्ये पृथ:करणासाठी पाठविण्यात येईल.

८.१४ आहाराचा पुरवठा करताना संस्थेस कोणतेही कर द्यावे लागल्यास त्याचा भरणा संस्थेने स्वत : करणे आवश्यक राहील . तसेच तयार आहाराचा वाहतुकीच्या दरम्यान अपघात झाल्यास अपघातग्रस्तास भरपाई देण्याची जबाबदारी संस्थेवर राहील.

८.१५ संस्था त्यांनी केलेल्या आहार पुरवठ्याच्या कामाचे मासिक शालानिहाय अहवाल (वजनासह) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद / कटक मंडळे यांना वेळोवेळी सादर करील . संस्थेने केलेल्या आहार पुरवठ्याचे देयक वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीनुसार राज्य स्तरावरुन थेटपणे शाळा व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यामध्ये जमा करुन शाळांमार्फत अदा केले जाईल. काही तांत्रिक अडचणी व अपरिहार्य कारणामुळे देयकाच्या अदायगीस विलंब झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही . ही अट अर्ज सादर करताना संस्थेस मान्य करणे आवश्यक आहे.

८.१६. आहार पुरवठ्याचे काम पुरवठादार संस्थेस स्वत : करावे लागेल. त्याकरिता उपकंत्राटदार नेमता येणार नाही. संस्था त्यांना नेमून दिलेले काम उपपुरवठादार नेमून करत असल्याचे आढळून आल्यास संस्थेस देण्यात आलेला कामाचा ठेका रद्द करण्यात येईल.

८.१७ आहार शिजवण्यासाठी हळद, मिरची पावडर, कांदा लसूण मसाला व गरम मसाला ह्या ब्रँडेड व अँगमार्क असलेल्या वापरणे अनिवार्य राहील . तसेच, फोर्टिफाईड सोयाबीन खाद्य तेल व डबल फोर्टिफाईड मीठ वापरणे अनिवार्य राहील.

८.१८ शासनाने निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे व शाळेने ठरविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे तयार आहाराची वाहतुक ही हवाबंद डब्यातून व बंदिस्त वाहनातून संबंधित शाळेपर्यंत करावी लागेल

८.१९ पुरवठादार संस्थेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या आहाराची चव संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून किंवा इतर शिक्षक यांचेकडून घेण्यात येईल . त्यानंतर त्या आहाराचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल . आहार खाण्यास अयोग्य असल्यास तो स्विकारला जाणार नाही.

८.२० निकृष्ट दर्जाचा आहार पुरविल्यामुळे / उशीरा आहार पुरविल्यामुळे किंवा अन्य कारणास्तव पुरवठादार संस्थेस दंड आकारण्यात आल्यास, दंडाच्या रकमेची वसुली प्रथम त्यांच्या देयकामधून करण्यात येईल व दंडाची रक्कम देयकापेक्षा अधिक झाल्यास त्यांची वसुली सुरक्षा अनामत रकमेतून करण्यात येईल.

८.२१ आहार पुरवठ्याबाबत कोणतीही गैर घटना घडल्यास त्यासंबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील. तसेच संस्थेने पुरवठा केलेल्या आहारामुळे विषबाधाचे घटना घडल्यास अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत नियमानुसार संस्था कारवाईस पात्र ठरेल.

८.२२ संस्था आहार पुरवठा करण्याचे काम करण्यात अथवा अटी शर्तीचे पालन करण्यात असमर्थ / अयशस्वी ठरल्यास त्यांचे काम कोणत्याही प्रकारचे लेखी स्वरुपात पूर्वसूचना न देता रद्द करण्याचा अथवा त्या कामाकरिता अन्य पुरवठादार संस्था नियुक्त करण्याचा अधिकार कटक मंडळ, पुणे यांचा राहील.

८.२३ स्वयंपाकगृहाचे स्थळ / ठिकाण अर्जामध्ये कळविल्याप्रमाणे त्याच ठिकाणी असणे आवश्यक आहे. गोडावून / स्वयंपाक गृह यांची तपासणी वेळोवेळी स्थानिक स्वराज्य संस्था / शासनामार्फत करण्यात येईल.

८.२४ स्वयंपाक गृह व स्वयंपाकासाठी आवश्यक असणारा तांदूळ व धान्यादी माल ठेवण्याची जागा (कोठी घर / Store Room / Godown) स्वतंत्र असावी.

८.२५ तांदूळ व धान्यादी माल ठेवण्याची जागा (कोठी घर / Store Room / Godown) दररोज आहार पुरवठाविषयक कामकाज पूर्ण झाल्यानंतर , सीलबंद करणे आवश्यक आहे . तसेच शालेय पोषण आहार योजनेसाठी वापरलेला तांदूळ व धान्यादी माल यांच्या नोंदवह्या दररोज अद्ययावत ठेवाव्यात.

८.२६ पुरवठादार संस्थेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या आहारात तपासणीमध्ये प्रथिने व उष्मांक विहीत परिमाणापेक्षा कमी आढळून आल्यास त्या दिवशी त्या संस्थेने पुरवठा केलेल्या सर्व शाळांतील आहाराची देयके अदा केली जाणार नाही . तथापि, सतत ३वेळा पेक्षा जास्त वेळा आहारातील प्रथिने व उष्मांकांचे प्रमाण कमी आढळून आल्यास अशा पुरवठाधारकाचे काम कोणतीही पूर्व सूचना न देता पूर्णपणे रद्द करण्याचे व पुरवठादार संस्थेला काळ्या यादीत टाकण्याचे अधिकार संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना राहील

८.२७ पुरवठा करण्यात आलेल्या आहारामुळे विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्यास , संबंधित पुरवठादाराविरुद्ध योग्य ती फौजदारी कारवाई करण्यात येईल . त्याचप्रमाणे संस्थेने त्या दिवशी आहार पुरवठा केलेली सर्व शाळांतील सर्व विद्यार्थ्यांसाठीची देयके अदा करण्यात येणार नाहीत . विषबाधा झालेल्या तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन पुरवठादारास सर्व वैद्यकीय खर्च करावा लागेल . जिवित हानी झाल्यास संपुर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील . अशा संस्थेचे काम कोणतीही पुर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल.

८.२८ ज्या पुरवठादार संस्थेमार्फत पुरविण्यात येणारा आहार ज्या दिवशी भेसळयुक्त असल्याचे आढळून आल्यास त्या दिवसाचा पुरवठा केलेल्या आहाराची देयके अदा करण्यात येणार नाहीत आहारामध्ये भेसळ करणे ही बाब गांभीर्यपूर्वक विचारात घेवून अन्न व भेसळ प्रतिबंध कायद्याखाली संस्था कारवाईस पात्र राहील.

तयार अन्न पुरविणाऱ्या संस्थेला खालील नमूद कारणांकरिता त्या दिवसाचे देयक अदा न करण्याचा अधिकार पुणे छावणी परिषदेला राहील.

१) विषबाधा झाल्यास
२) प्रयोग शाळा तपासणी अहवालामध्ये नमुने असमाधानकारक आढळल्यास
३) धान्यामध्ये भेसळ आढळल्यास
४) धान्य निकृष्ट दर्जाचे आढळल्यास
५) आवश्यक प्रथिने व उष्मांक अन्नामध्ये न आढळल्यास

सही /-

मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे छावणी परिषद